शहापूरच्या शाळा प्रगतीपथावर!

पंकज चव्हाण, ठाणे

शहापूर तालुका आदिवासी आणि अतिदुर्गम ग्रामीण भाग म्हणून ओळखला जातो. या तालुक्याच्या परिसराचा दोन दशकांपूर्वी या भागातील शाळांची अवस्था फार बिकट होती. अनेक मूलभूत गोष्टींची येथे वानवा होती. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून कोसो मैल दूर होते. आता परिस्थितीत या भागातील शाळा शहरी शाळांशीही स्पर्धा करतील, असे सकारात्मक कोणालाही वाटले नसेल. मात्र गेल्या दोन वर्षांत शाळांमध्ये होत असलेला आमूलाग्र बदल पाहिल्यानंतर हा अंदाज खोटा ठरत असून, शहापूरच्या जिल्हा परिषदेच्या शाळा खरोखरच शाळांशीही स्पर्धा करत प्रगतीचे उंच शिखर गाठत आहेत.

१३४ शाळा डिजिटल; दोन वर्षांत उंचावला आलेख

या भागात ४१८ शाळा असून यातील तब्बल १३४ शाळा डिजिटल झाल्या आहेत, तर १३६ शाळा ध्येयानुसार प्रगत आहेत. शाळांतील एकूण विद्यार्थ्यांची संख्या २४ हजार ५०० आहे. पंढरी होत असलेल्या स्वच्छ विद्यालय पुरस्काराच्या अंतिम नऊ शाळांमध्ये शहापूरच्या दोन शाळांचा समावेश आहे. त्यामुळे ही प्रगती अन्य शाळांच्या तुलनेत झपाट्याने होत असल्याने शहापूरच्या शाळांच्या प्रगतीची दखल येऊलोकेती घेण्यात येत आहे.

लोकसहभाग, बी. एस. आर फंडातून अथवा दोन वर्षांत तीन जोडीची पुंजी शाळेसाठी जमा झाली आहे. त्यामुळे या भागातील अनेक शाळांमध्ये भौतिक सुविधांचा उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी कार्यप्रेरणा कार्यशाळा, संकल्प कार्यशाळा, दर महिन्याला केंद्रप्रमुखांचे होणारे संमेलन, आठवडी पोथी या शाळा प्रगत होण्यासाठी पूरक ठरल्या आहेत. शिवाय, मागील ७० शाळांमध्ये झालेल्यानंतर ५८ शाळांमध्ये डिजिटल करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये लक्षणीय प्रगतीदेखील होत आहे.

शहापूरसारख्या दुर्गम भागातील शाळांची झपाट्याने होत असलेली प्रगती अभिमानास्पद बाब असून या प्रगतीमागे येथील शिक्षक, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींचा मोठा वाटा आहे. येत्या काही वर्षांत ४१८ शाळा डिजिटल करण्याचे आमचे ध्येय आहे.

- अतिरिक्त मुख्यकारण, जिल्हा परिषद अधिकारी, शहापूर

आदिवासींना आश्रमशाळा हा एकच आधार असतो पण तिथे एका वर्गात १३५ मुले शि

विज्ञान आदिवासींपर्यंत पोहचविण्याची गरज

डॉ. अभय बंग यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

आज जगभरात सुमारे ७ हजारांहून अधिक आदिवासी जमाती आहेत. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उच्च शिक्षण त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन दुर्गम आदिवासी भागात आदिवासींच्या आरोग्याच्या प्रश्नावर काम करणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी सोमवारी मुंबईत केले.

मुंबई विद्यापीठात आयोजित १८व्या इंडियन सायन्स कॉंग्रेसदरम्यान सोमवारी आदिवासी नागरिकांचे आरोग्य आणि त्यासंदर्भात विज्ञान आणि तंत्रज्ञानासंदर्भात आयोजित या विशेषज्ञ आयोजित व्याख्यानमालेत डॉ. बंग यांनी हे मत व्यक्त केले. यावेळी नेशनल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च इन ट्रायबल हेल्थच्या संचालक निरू सिंह, इंटरनेशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सचे प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ ए. लक्ष्मीपथ आणी मान्यवर उपस्थित होते.

आदिवासींपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी सरकारने सुमारे ५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तरीही आदिवासींपर्यंत सुविधा पोहचत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मुळात आदिवासींच्या गरजा काय आहेत, सरकारने दिलेल्या पैशांचे त्यांच्या उपयोगात आहेत का, याचा विचार करण्याची गरज आहे. आदिवासी भागात असलेले दवाखाने मुळ आदिवासी पाड्यांपासून दूर आहेत. त्यामुळे आरोग्य सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. पाड्यांवरील दवाखाने, अंगणवाड्यांमध्ये मुळ आदिवासी कार्यकर्ते महिलांचे ट्रेनिंग, आदिवासींच्या आरोग्य सुविधांसाठी काम उपलब्धतेबाबत उपलब्ध वेतील, यांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तत्पूर्वी निरू सिंह, पंटरोसेन आणि डॉ. लक्ष्मीपथ आदी मान्यवरांनी आदिवासी भागातील कुपोषण, उच्च मलेरिया, जादुटोणा यासारखे आणी गावांवर प्रकाश टाकला.

आदिवासींसाठी आरोग्याचे आव्हाने

● कुपोषण व बालमृत्यूचे जास्तीत प्रमाण ●टीबी आणि लेप्रसी रोग्यांचे मोठे प्रमाण ●मलेरियाचे जास्ते प्रमाण ● हायपर टेंशन ● डिमेंशनेविषयी कमतरता ● जीवनशैलीचा अभाव